मंगळवार १६/०२/२०२१ अंक १११ ४ ₹ पाने ८

# ऐक्य

माघ शुक्ल ५ शके १९४२ नक्षत्र रेवती. शुभ दिवस.

## ब्लॉग लेखन म्हणजे मुक्त स्वरूपात अभिव्यक्त होण्याचा राजमार्ग : प्रा. डॉ. गपाट



बोलताना डॉ.सचिन गपाट, व्यासपीठावर प्रा. रुक्साना पठाण, डॉ. अनिलकुमार लावले, डॉ.अनिसा मुजावर, डॉ. संदीप किर्दत.

▲ सातारा, दि. १५ : आज विज्ञान व तंत्रज्ञान मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनले आहे. गुगल ज्ञानाचा महास्त्रोत आहे. वेबसाईट व ब्लॉग हे गुगलवरील महत्त्वाचे डिजिटल स्त्रोत आहेत. कोरोना काळात शिक्षण क्षेत्रातील इंटरनेटचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले. अभिव्यक्त होण्याचे एक प्रभावी लेखन साधन आहे, असे प्रतिपादन मुंबई विद्यापीठातील हिंदी विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. सचिन गपाट यांनी व्यक्त केले.

स्वतःचे लेखन जागतिक व्यासपीठावर पोहचवता येते. ब्लॉग हा डायरीसारखा प्रकार आहे. ज्यामध्ये आपण आपल्या प्रतिभेनुसार कोणत्याही साहित्य प्रकारात किंवा टिप्पणी स्वरूपात ही व्यक्त होऊ शकतो. एका अर्थाने ब्लॉग लेखन मुक्त स्वरूपात अभिव्यक्त होण्याचा राजमार्ग आहे.

येथील रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथील हिंदी विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांचे संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे प्राचार्य व रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्रिं. डॉ. व्ही. एस. शिवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान अंतर्गत 'ब्लॉग लेखन कौशल्ये' या विषयावर आयोजित एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात प्रमुख विषयतज्ज्ञ म्हणून बोलत होते.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अनिसा मुजावर होत्या. अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे, अंतर्गत देखरेख समितीचे प्रो. डॉ. सुरेश झोडगे व प्रा. डॉ. सुभाष वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. सचिन गपाट म्हणाले, ब्लॉगचा इतिहास पंचवीस वर्षे जुना आहे. ब्लॉग लिहिणारांनी डोमेन, वेब होस्टिंग, ब्लॉगिंग प्लॅटफॉर्म, ब्लॉगर, टॉपिक इ. ब्लॉग लेखना संबंधीच्या संज्ञा समजून घ्याव्यात. वर्डप्रेस, ब्लॉगस्पॉट, मेडिअम तुम्बीर, व्हीब्लाय, व्हीक्स्कॉम, पेंझू ,प्लुसेईन इ. ब्लॉग लेखनाचे प्लॅटफॉर्म आहेत. ब्लॉग लेखनातून रँकिंग मिळवण्यासाठी संकेत शब्द अर्थात की-वॅर्डची निवड महत्त्वाची असते.

रँकिंग वाढले की ब्लॉगवरती ट्रॅफिक वाढते. सृजनशील व्यक्ती ब्लॉग लिहिताना चित्र, व्हिडिओ, रंगसंगती इ. च्या माध्यमातून आपले विचार इतरापर्यंत डिजिटल स्वरूपात पोहचवू शकतो. ब्लॉग लिखाणातून एक लेखक व विषयतज्ज्ञ म्हणून स्वतःची ओळख निर्माण करता येते.

प्रो. डॉ. मुजावर म्हणाल्या, ब्लॉग लेखन हे ग्लॅमर असलेले व अर्थार्जन करून देणारे क्षेत्र आहे. मात्र यासंबंधीची कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. आपण जे लिहितो ते स्वतः जवळ न राहता सहज-पणे जागतिक व्यासपीठावर पोहचविणारे प्रभावी माध्यम ब्लॉग आहे. प्रत्येक शिक्षकाने आधुनिक काळातील या नवीन टेक्नॉलॉजीचा उपयोग करून आपल्या विषयातील व सभोवतालातील गोष्टीबाबत ब्लॉगच्या मानदंडात व्यक्त व्हायला हवे.

यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना स्वतःचे ब्लॉग सुरू करण्याचे व आपले लेखन पोस्ट करण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक हिंदी विभागप्रमुख प्रा. रुक्साना पठाण यांनी केले. पाहुण्यांचा परिचय कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. डॉ. संदीप किर्दत यांनी केले.

प्रा. डॉ. सविता मेनकुदळे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. भूपेंद्र निकाळजे यांनी आभार मानले. प्रा. डॉ. सादिक तांबोळी यांनी संयोजनात सहकार्य केले. प्रा. डॉ. सुधाकर कोळी व प्रा. नितीन पवार यांनी तांत्रिक सहकार्य केले. नावीन्यपूर्ण व आवश्यक अशा विषयावरती हॅण्ड्स ऑन ट्रेनिंग घेतल्याची प्रतिक्रिया सहभागी प्रध्यापकांनी दिल्या.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.